# दि. मुस्लिम कॉ-ऑप. बँक ली. पुणे

प्रशासकीय कार्यलय : ६४७, भवानी पेठ, पुणे - ४११०४२.

९७ व्या घटना दुरुस्ती अन्वये सभासदांच्या क्रियाशील व अक्रियाशील वर्गीकरणाबाबत

केंद्र शासनाने ९७ वी घटना दुरुस्ती केली या या घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने राज्य शासनाने सन २०१३ मध्ये महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० मध्ये बदल केले असून त्यास सुसंगत व सहकार खात्याच्या मार्गदर्शक तत्वानुसार दि मुस्लिम सहकारी बँक मर्यादित पुणे ने आदर्श पोटनियमची स्वीकृती केली आहे.

सुधारित पोटनियमात बँकेच्या कामकाजामधील सहभागाच्या आधारे सभासदाचे "क्रियाशील" (ऍक्टिव्ह) व "अक्रियाशील " (नॉन-ऍक्टिव्ह) असे वर्गीकरण करावे लागते त्यानुसार फक्त क्रियाशील सभासदांनाच बँकेच्या संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणुकीत मतदानाचा अधिकार असतो.

क्रियाशील सभासद असण्यासाठी बँकेच्या कामकाजात सभासदाचा खालीलप्रमाणे किमान सहभाग असणे आवश्यक आहे.

१. किमान भागधारण (शेअर्स) रु. १५००/- (आज मितीस आपल्या बँकेस लागू असलेल्या ठेवी नुसार)

२. किमान ठेव. रु. ७,०००/- अथवा किमान कर्ज रु. १,००,०००/-

वरील गोष्टीची पूर्तता न केल्यास सभासदांची अक्रियाशील सभासद म्हणून वर्गवारी करण्यात येते., परंतु

सहकार कायदयातील तरतुदीनुसार वरील निकषांची पूर्तता केल्यानंतर अक्रियाशील सभासदांचे पुन्हा क्रियाशील सभासदात वर्गीकरण केले जाते.

अक्रियाशील सभासदांनी वरीलप्रमाणे पूर्तता दि. 30 आक्टोबर २०१९ पूर्वी करून पुन्हा क्रियाशील सभासद असे वर्गीकरण करून घ्यावे हि विनंती.

* दि मुस्लिम सहकारी बँक मर्यादित पुणे च्या क्रियाशील व अक्रियाशील सभासदबाबतची माहिती बँकेने प्रत्येक वार्षिक अहवालात दिली आहेच.

* अक्रियाशील सभासची यादी बँकेच्या मुख्य कार्यालयच्या शेअर्स विभागात उपलब्ध आहे.

* या व्यतिरिक्त ज्या सभासदांना अद्याप हि आपले मोबाइल क्रमांक, मेल आई डी. अपडेट केलेले नसतील त्यांनी त्वरित शाखेत किंवा प्रशासकीय कार्यलयात शेयर्स विभागाशी संपर्क करुंन मोबाइल क्रमांक, मेल आई डी. अपडेट करावे.

ज्या सभासदाच्या कर्ज खात्यावर थकबाकी असेल त्या सभासदास मतदानाचा अधिकार राहणार नाही.

या बाबत आपल्या जवळच्या शाखेच्या मॅनेजर यांचेकडून त्वरित साहय प्राप्त करता येईल किंवा बँकेच्या प्रशासकीय कार्यलयातील शेयर्स विभागाशी संपर्क साधावा. .

डॉ. हारून सय्यद
मुख्य कार्यकारी अधिकारी
दि मुस्लिम सहकारी बँक मर्यादित पुणे

पुणे
दिनांक. 04/10/2019